PARLE MAHOTSAV

Organiser - ADV. PARAG ALAVANI, President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

PARLE MAHOTSAV

दि. २१.११.२०१६

**कृपया प्रसिद्धीकरिता**

# पार्ले महोत्सवातील तरुणाईने दिला मोदींना प्रतिसाद हात उंचावून केले नोटबंदीचे समर्थन

मुंबई दि. २१ : १७ व्या पार्ले महोत्सवात उपस्थित तरुण वर्गाने पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत नोटबंदीच्या निर्णयाचे समर्थन केले. महोत्सवातील कबड्डी, व्हॉली बॉल, बॉक्स क्रिकेट स्पर्धेतील खेळाडू व स्टेडीयम मधील प्रेक्षकांसमोर अर्थतज्ञ मुकुंद चितळे यांनी नोट बंदीबाबत माहिती दिली. काळ्या पैशाविरोधातील या निर्णयामुळे देशाचे भले होणार असून हात वर करुन मोदीजींना समर्थन द्यावे असे सांगताच उपस्थित तरुणाईने दोन्ही हात वर केले.

"करुया स्वच्छ भारत, स्वच्छ कारभार" ही १७ व्या पार्ले महोत्सवाची थीम असल्याची माहिती प्रमुख आयोजक आमदार ॲड. पराग अळवणी यांनी दिली. तसेच शनिवारीच ग्लोबल फेस्टीवल मधील उपस्थित तरुणांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बेरोजगारी, भ्रष्टाचार व अस्वच्छता या विरोधात प्रत्येक निर्णयामध्ये तुमची साथ हवी आहे अशी साद घातली होती. त्या पार्श्वभूमीवर पार्ले महोत्सवातील स्पर्धकांच्या माध्यमातून स्वच्छ भारत, स्वच्छ कारभाराबाबत जागृकता वाढवण्याचा प्रयत्न करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

१७ व्या पार्ले महोत्सवास स्पर्धकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला असून वाढलेल्या स्पर्धक संख्येमुळे रविवार ऐवजी शुक्रवारीच काही स्पर्धा सुरु कराव्या लागल्या त्यामुळे रविवारी झालेल्या औपचारीक उद्घाटनापूर्वीच सुमारे ५००० स्पर्धकांनी भाग घेतला अशी माहिती आमदार ॲड. पराग अळवणी यांनी दिली.

महोत्सवात आत्तापर्यंत कबड्डी, व्हॉली बॉल, बॉक्स क्रिकेट, ५० मिटर धावणे, गोळा फेक, स्लो सायकलिंग अशा विविध स्पर्धांची सुरुवात झाली आहे. या दरम्यान नगरसेविका ज्योती अळवणी, नगरसेवक महेश पारकर, नगरसेवक हरिष भांर्दिगे, अर्थतज्ज्ञ मुकुंद चितळे, सुनिल मोने, संतोष केळकर, सारस्वत बँकेचे मॅनेजर मंगेश नाडकर्णी इत्यादी मान्यवर उपस्थित होते अशी माहिती पार्ले महोत्सव आयोजन समितीचे अध्यक्ष गुरचरण सिंह संधू यांनी दिले.

---

सदर पत्रक श्री. प्रविर कपूर यांनी प्रसिद्ध केले आहे.